## - निवेदन -

सामान्यपणे प्रत्येकाला संगीताची गोडी असते, आवड असते. जाणत्या, अजाणत्या नाही संगीत मोहून टाकते. अशा या संगीताने मराठी रंगभूमी निनादून गेली होती. वर्षानुवर्षे लोटली तरी त्या जुन्या नाटकातील गाण्यांची गोडी अजूनही कमी झालेली नाही. तेव्हा मनाला आनंद देणाऱ्या या संगीत नाटकांचा विचार करावा असे मनात आले आणि संशोधनासाठी या विषयाची निवड केली. या विषयावर अनेक थोर व्यक्तींनी आपले विचार आजपर्यंत मांडले आहेत पण माझ्या कुवतीनुसार मी संगीत नाटकाच्या घडणीपासून ते विकासापर्यंत विचार करण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये काही त्रुटी असतील याची मला जाणीव आहे.

प्रबंधाचा प्रपंच माझ्यासारख्या सर्वसामान्य अभ्यासूला अनेकांच्या सहकार्याशिवाय होत नाही. डॉ. सुधाकर के. भोसले या माझ्या गुरुवर्यांचे आभार मानण्यास माझ्याजवळ शब्द नाहीत. त्यांच्या कुशल व बहुमोल मार्गदर्शनाशिवाय हे संशोधन अक्षरश: दिशाहीन झाले असते. त्यांच्या सदैव आशादायी प्रोत्साहनामुळे आणि आशीर्वादामुळेच हाती घेतलेले हे काम मी पूर्ण करु शकले. त्यांच्या ऋणाचा मी येथे कृतज्ञतापूर्वक उल्लेख करते.

माझ्या संगीत कलेतील गुरु श्री. ना. वा. दिवाण यांचे मला या कामी बहुमोल मार्गदर्शन झाले आहे.

या प्रबंधलेखनाच्या निमित्ताने अनेक विद्वानांशी चर्चा करण्याचे भाग्य मला लाभले. त्यांचे जितके आभार मानावे तितके ते थोडेच होतील.

पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय, पुण्याचे शासकीय विभागीय ग्रंथालय आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे ग्रंथालय यांची मला या कामात फार मदत झाली आहे. तेथील व्यवस्थापकांची मी आभारी आहे.

सूची तयार करताना डॉ. कल्याण काळे यांनी मला मार्गदर्शन केले, त्यांची मी मन:पूर्वक आभारी आहे.

प्रस्तुत प्रबंधाच्या उभारणीत माझे वडील आणि आई श्री. प्रभाकर अनंत ठकार आणि सौ. शांता प्रभाकर ठकार यांचे आशीर्वाद मला लाभले हे मला कृतज्ञतेने सांगावेसे वाटते.

टंकलेखकाकडील टंकयंत्रामध्ये काही मोठा बिघाड झाल्यामुळे मला नाईलाजाने बाकीची पाने दुसऱ्या टंकयंत्रावर टंकलिखित करून घ्यावी लागली त्यामुळे या प्रबंधात दोन भिन्न वळणाची अक्षरे दिसतील त्याबद्दल मी दिलगीर आहे.

सौ. जयश्री प्र. रामदासी.

— oo —